# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** दिव्यांग बालकांच्या सौम्य दिव्यांगत्वाची परिणति तिव्र स्वरुपात
**{समाज विकास विभाग}** होऊ नये याकरिता त्यांचा शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, सामाजिक, भावनिक आणि बौध्दिक विकासाकरिता पुनर्वसनात्मक सेवा विहित वेळेत उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्वरित निदान आणि जलद हस्तक्षेप ( Early Detection & Interventions) म्हणजे दिव्यांगत्वाची लक्षणे वयाच्या जेवढया लवकर सोधल्या जाईल तेवढयाच लवकर आणि जलद दिव्यांगत्वाचे निदान करुन चिकित्सक व पुनर्वसनात्मक सेवा पुरविणे आणि दिव्यांग आटोक्यात आणणे हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. तथापि, दिव्यांग बालकांचे पालक आर्थिक दृष्टया सक्षम नसल्याने दिव्यांगत्वाचे त्वरित निदान आणि जलद हस्तक्षेप या सेवा घेऊ शकत नाही. सदर्हु प्रकल्प नागपूर महानगरपालिका समाज कल्याण विभाग आणि जिल्हा पुनर्वसन केंद्र (डी. डी. आर. सी.) नागपूर यांचे समन्वयाने नागपूर शहरी भागात हा प्रकल्प राबविण्याकरिता मा. अध्यक्ष, जिल्हा व्यस्थापन समिती तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांचेमार्फत विस्तृतपणे प्रस्ताव विभागास प्राप्त झाला आहे.

नागपूर शहरातील वय वर्ष ० ते ६ वयोगटातील ६० % च्या वर दिव्यांगत्व तसेच उच्च आधराची (High Support Need) गरज असणाऱ्या, बहुदिव्यांग (Multiple Disabilities) दिव्यांग बालकांच्या मातांना दिव्यांगत्व प्रतिबंधनासाठी तसेच शीघ्र हस्तक्षेप इत्यादी उपचारात्मक व सहाय्यभूत सेवा घेण्यासाठी प्रती माहे प्रती लाभार्थी रु. १०००/- प्रोत्साहन भत्ता अंदाजे लाभार्थी संख्या २५० DBT मार्फत देण्याची 'राजमाता जिजाऊ अर्थसहाय योजना' नागपूर महानगरपालिका समाज कल्याण विभाग आणि जिल्हा पुनर्वसन केंद्र (डी. डी. आर. सी.) नागपूर यांचे समन्वयाने राबविण्यात आल्यास नागपूर शहरातील आर्थिक दृष्टया अक्षम दिव्यांग बालकांच्या मातांना निश्चितच लाभ होईल.

'राजमाता जिजाऊ अर्थसहाय योजना' नागपूर शहरात राबविण्यास्तव तसेच या योजनेंतर्गत नागपूर शहरातील वय वर्ष ० ते ६ वयोगटातील ६०% च्या वर दिव्यांगत्व तसेच उच्च आधाराची (High Support Need) गरज असणाऱ्या, बहुदिव्यांग (Multiple Disabilities) दिव्यांग बालकांच्या मातांना दिव्यांगत्व प्रतिबंधनासाठी तसेच शीघ्र हस्तक्षेप इत्यादी उपचारात्मक व सहाय्यभूत सेवा घेण्यासाठी प्रती माहे प्रती लाभार्थी रु. १०००/- प्रोत्साहन भत्ता DBT अंतर्गत अंदाजे लाभार्थी संख्या २५० व इतर प्रकल्प व्यस्थापन, योजना प्रसिध्दी इत्यादी साठी येणारा प्रशासकीय खर्च रु. ३३,१०,०००/- (तेह्हतीस लक्ष दहा हजार फक्त) एवढा निधी जिल्हा पुनर्वसन केंद्र (डी.डी. आर. सी.) नागपूर यांना उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणेबाबत.

**टिप** :- १) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.
२) सदर्हु खर्च दिव्यांग कल्याणार्थ राखीव पद क्र. A-२७३०१३४२३ (३१७) मधून करण्यात येईल.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 419/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 15/06/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार दिव्यांग बालकांच्या सौम्य दिव्यांगत्वाची परिणति तिव्र स्वरुपात होऊ नये याकरिता त्यांचा शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, सामाजिक, भावनिक आणि बौध्दिक विकासाकरिता पुनर्वसनात्मक सेवा

विहित वेळेत उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्वरित निदान आणि जलद हस्तक्षेप ( Early Detection & Interventions) म्हणजे दिव्यांगत्वाची लक्षणे वयाच्या जेवढया लवकर सोधल्या जाईल तेवढयाच लवकर आणि जलद दिव्यांगत्वाचे निदान करुन चिकित्सक व पुनर्वसनात्मक सेवा पुरविणे आणि दिव्यांग आटोक्यात आणणे हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. तथापि, दिव्यांग बालकांचे पालक आर्थिक दृष्टया सक्षम नसल्याने दिव्यांगत्वाचे त्वरित निदान आणि जलद हस्तक्षेप या सेवा घेऊ शकत नाही. सदर्हु प्रकल्प नागपूर महानगरपालिका समाज कल्याण विभाग आणि जिल्हा पुनर्वसन केंद्र (डी. डी. आर. सी.) नागपूर यांचे समन्वयाने नागपूर शहरी भागात हा प्रकल्प राबविण्याकरिता मा. अध्यक्ष, जिल्हा व्यस्थापन समिती तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांचेमार्फत विस्तृतपणे प्रस्ताव विभागास प्राप्त झाला आहे.

नागपूर शहरातील वय वर्ष ० ते ६ वयोगटातील ६० % च्या वर दिव्यांगत्व तसेच उच्च आधराची (High Support Need) गरज असणाऱ्या, बहुदिव्यांग (Multiple Disabilities) दिव्यांग बालकांच्या मातांना दिव्यांगत्व प्रतिबंधनासाठी तसेच शीघ्र हस्तक्षेप इत्यादी उपचारात्मक व सहाय्यभूत सेवा घेण्यासाठी प्रती माहे प्रती लाभार्थी रु. १०००/- प्रोत्साहन भत्ता अंदाजे लाभार्थी संख्या २५० DBT मार्फत देण्याची ‘राजमाता जिजाऊ अर्थसहाय योजना’ नागपूर महानगरपालिका समाज कल्याण विभाग आणि जिल्हा पुनर्वसन केंद्र (डी. डी. आर. सी.) नागपूर यांचे समन्वयाने राबविण्यात आल्यास नागपूर शहरातील आर्थिक दृष्टया अक्षम दिव्यांग बालकांच्या मातांना निश्चितच लाभ होईल.

‘राजमाता जिजाऊ अर्थसहाय योजना’ नागपूर शहरात राबविण्यास्तव तसेच या योजनेंतर्गत नागपूर शहरातील वय वर्ष ० ते ६ वयोगटातील ६०% च्या वर दिव्यांगत्व तसेच उच्च आधाराची (High Support Need) गरज असणाऱ्या, बहुदिव्यांग (Multiple Disabilities) दिव्यांग बालकांच्या मातांना दिव्यांगत्व प्रतिबंधनासाठी तसेच शीघ्र हस्तक्षेप इत्यादी उपचारात्मक व सहाय्यभूत सेवा घेण्यासाठी प्रती माहे प्रती लाभार्थी रु. १०००/- प्रोत्साहन भत्ता DBT अंतर्गत अंदाजे लाभार्थी संख्या २५० व इतर प्रकल्प व्यस्थापन, योजना प्रसिध्दी इत्यादी साठी येणारा प्रशासकीय खर्च रु. ३३,१०,०००/- (तेहहतीस लक्ष दहा हजार फक्त) एवढा निधी जिल्हा पुनर्वसन केंद्र (डी.डी. आर. सी.) नागपूर यांना उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**